# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
## जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१

फोन नं.(०२०) २६०५०६४१ ई-मेल आयडी :- sccapune@gmail.com

जा.क्र.रासनिप्रा/ कक्ष- अभिलेख-१४४/ बाजार समिती / उमेदवार घोषणापत्र/ 2८८2/२०१८ दिनांक १९/०४/२०१८.

वाचावे:- १. महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन(विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ चे कलम कलम १४ अ (१) (अ) मधील तर तूद.
२.महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन)अधिनियम,१९६३.
३. महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनयमन)( सुधारणा) नियम,१९६७.
४. महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समित्या (समितीची निवडणूक) नियम २०१७ चे नियम ३(iv) मधील तरतूद.

**विषय :- नामनिर्देशनपत्रा सोबत इच्छूक उमेदवारांकडून घ्यावयाचे घोषणापत्राबाबत..**

ज्या अर्थी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम१९६३ चे कलम १४ अ (१)(अ) मधील तरतूदीनुसार राज्यातील बाजार समित्यांच्या सर्व निवडणूकांचे अधिक्षण, संचलन व नियंत्रण यांची जबाबदारी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाची आहे. आणि,

ज्या अर्थी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समित्या (समितीची निवडणूक) नियम २०१७ चे नियम ३ (iv) मधील तरतूदीनुसार बाजार समितीच्या निवडणूकीचे पावित्र्य राखणे आणि अशा निवडणूका निर्भय . मुक्त व पारदर्शक वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीने इच्छूक उमेदवारांकडून नामनिर्देशनपत्रासोबत घोषणापत्र घेणे आवश्यक आहे. आणि.

ज्या अर्थी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समित्या (समितीची निवडणूक) नियम २०१७ चे नियम १० मधील तरतूदीनुसार बाजार समिती सदस्यत्वासाठीच्या अपात्रता नमूद करण्यात आलेल्या आहेत. आणि,

ज्या अर्थी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समित्या (समितीची निवडणूक) नियम २०१७ चे नियम २० व २१ मधील तरतूदीनुसार उमेदवाराचे नामनिर्देशनपत्र सादर करणे आणि वैध नामनिर्देशनपत्रासाठी आवश्यक असलेल्या बाबी व त्यासोबत सादर करावयाची घोषणापत्र इत्यादी बाबी नमूद आहे. मात्र सदर तरतूदीमध्ये उमेदवारी दाखल करणारी व्यक्ती ही महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन)अधिनियम,१९६३ व त्याखालील नियम १९६७, महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समित्या (समितीची निवडणूक) नियम २०१७ आणि समितीचे मंजूर उपविधीप्रमाणे तो अपात्र / अनर्ह ठरत नसल्याचे घोषणापत्राचा उल्लेख नाही. सदरचे घोषणापत्र घेतल्यास निवडणूक निर्णय अधिका-यांचे कामकाज सुलभ होणेस व उमेदवारी करणारे व्यक्तीवर नैतिक व कायदेशीर जबाबदारी येणे क्रमप्राप्त असल्याने सदरचे घोषणापत्र घेणे बंधनकारक करणे आवश्यक असल्याचे प्राधिकरणाचे ठाम मत झाले आहे. आणि,

2021/8/30 17:15
Scanned with CamScanner

ज्या अर्थी निवडणूक नियम ३(iv) मध्ये " निवडणूका सुरळीतपणे व मुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी अधिनियमांच्या व नियमांच्या तरतूदींशी विसंगत नसतील असे विशेष किंवा साधारण आदेश किंवा निर्देश देणे" बाबत प्राधिकरणास अधिकार प्राप्त आहेत.

त्या अर्थी, महाराष्ट्र कृषी उत्पन्न बाजार समित्या (समितीची निवडणूक) नियम २०१७ चे नियम ३(iv) अनुसार प्राप्त अधिकारांचा वापर करून प्राधिकरण पुढील आदेश पारित करीत आहे.

## -: आदेश :-

कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणूकीत उमेदवारांकडून महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन)अधिनियम,१९६३, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनयमन)( सुधारणा) नियम,१९६७ , महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समित्या (समितीची निवडणूक) नियम २०१७ चे नियम १० मधील तरतूदीनुसार व बाजार समितीचे मंजुर उपविधीमधील तरतूदी मध्ये नमूद केलेली कोणतीही अपात्रता धारण करीत नसल्याबाबतचे घोषणापत्र इच्छूक उमेदवारांकडून नामनिर्देशनपत्रासोबत घेणे अनिवार्य करीत आहे.

**मा. आयुक्त, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे आदेशाने.**

**सोबत :-** उमेदवाराचे घोषणापत्राचा नमुना

(यशवंत गिरी)
सचिव
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण
महाराष्ट्र राज्य, पुणे.

**प्रति,**

१. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी (कृ.उ.बा.स.) (सर्व)
२. जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था, (सर्व)
३. उप/ सह निबंधक,सहकारी संस्था (सर्व)
४. सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती (सर्व)
५. संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी.

2021/8/30 17:15

Scanned with CamScanner

## Declaration by candidate

I hereby declare that I do not incur any disqulification under the Maharashtra Agricultural produce Marketing (Development and Regulation) Act 1963 , the Maharashtra Agricultural produce Marketing (Development and Regulation) (Amendment) Rules,1967, the Maharashtra Agricultural produce Market committee (Election to committee) Rules 2017 and the apporved bye-laws of the APMC.

Place:-

Date :-

---------------------

Signature of the candidate

## उमेदवाराचे घोषणापत्र

मी याद्वारे घोषित करतो की, मी महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन)अधिनियम,१९६३, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन)( सुधारणा) नियम,१९६७ , महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समित्या (समितीची निवडणूक) नियम ,२०१७ व बाजार समितीचे मंजूर उपविधी मध्ये नमूद केलेली कोणतीही अपात्रता धारण करीत नाही.

ठिकाण:-

दिनांक:-

------------------

उमेदवाराची सही

2021/8/30 17:16

Scanned with CamScanner